# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

## मा. अ प्रभाग समिती

## विशेष सभा

## सभावृत्तांत

दिनांक –२७/०४/२०१८ वेळ : स.१०.३०

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. अ प्रभाग समितीची मा. सभापती निवडीची विशेषसभा शुक्रवार दिनांक २७/०४/२०१८ रोजी स.१०.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकर रामचंद्र पवळे सभागृहात, मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचे मार्फत नेमणूक केलेले पीठासीन अधिकारी श्री.अशोक काकडे (भा.प्र.से) मुख्य अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण, आगरकरनगर, पुणे ४११००१ यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. अनुराधा गणपत गोरखे
२. मा.केशव हनुमंत घोळवे
३. मा.तुषार रघुनाथ हिंगे
४. मा. शैलजा अविनाश मोरे
५. मा. बाबर शर्मिला राजू
६. मा. कोमल दिपक मेवानी

याशिवाय श्री. मंगेश चितळे, क्षेत्रीय अधिकारी, श्री लटपटे रामकिसन, प्रशासन अधिकारी तथा सचिव, अ प्रभाग समिती, हे उपस्थित होते.

-------

**पीठासीन अधिकारी** सन्मा. सदस्य, क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. यासाठी विभागीय आयुक्त यांनी सभेचा पीठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. अ प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणे बरोबरच त्या कामकाजाची व्हिडीओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सुचना करतो.

प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)

मा. अ प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकूण ३(तीन) नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे

| अ क्र | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मा. अनुराधा गणपत गोरखे | मा. कोमल दिपक मेवानी | मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे |
| २ | मा. अनुराधा गणपत गोरखे | मा. शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे | मा.केशव हनुमंत घोळवे |
| ३ | मा. अनुराधा गणपत गोरखे | मा.शैलजा अविनाश मोरे | मा. बाबर शर्मिला राजू |

( प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा यांनी त्यांना प्राप्त झालेले एकूण ३(तीन) नामनिर्देशन पत्र पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केले. मा. पीठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.)

पीठासीन अधिकारी

मा. अ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त एका उमेदवाराचे ३ (तीन) नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असुन त्यामध्ये मा. अ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. अनुराधा गणपत गोरखे हया एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. उमेदवारी अर्जमागे घेण्यासाठी सकाळी 10.35 ते 10.50 याप्रमाणे वेळ देणेत आलेली होती. दिलेल्या वेळेत उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही.

मा. अ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. अनुराधा गणपत गोरखे हया एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्यामुळे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती, यांची निवडणूक घेणे ), नियम २००७ मधील ~~कलम~~ नियम ६ नुसार मा. अनुराधा गणपत गोरखे यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अ प्रभाग समिती सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

Ashokkakade

अशोक काकडे (भा.प्र.से)
पीठासीन अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण,
आगरकरनगर, पुणे ४११००१

# पिंपरी चिंचवड महानगर पालिका, पिंपरी-१८
## मा. अ प्रभाग समिती
## विशेष सभा

ठराव क्रमांक – १
दिनांक –२७/०४/२०१८

विषय क्रमांक – १
विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समिती सभापती पदाकरीता मा. अनुराधा गणपत गोरखे या उमेदवाराने एकूण ३ (तीन) नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल केले असून सदर नामनिर्देशनपत्र छाननीमध्ये वैध ठरलेले आहे. अ प्रभाग समिती सभापती पदाकरीतामा. अनुराधा गणपत गोरखे हया एकच उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अ प्रभाग समिती सभापती म्हणून रितसर वैधरित्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

Ashokkakade

अशोक काकडे (भा.प्र.से)
पीठासीन अधिकारी तथा
मुख्यअधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण,
आगरकरनगर, पुणे ४११००१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी ४४
क्रमांक : अक्षेका//कावि/८५ /२०१८
दिनांक :२७/०४/२०१८

प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभा शाखा
अ प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८**
**अ प्रभाग समिती सभापती निवडणूक २०१८**

अ प्रभाग समिती सभापती पदाकरीता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या सर्व उमेदवारांची नांवे

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव |
|---|---|
| १ | मा. अनुराधा गणपत गोरखे |

दिनांक - २७/०४/२०१८

Ashokkakade
**अशोक काकडे (भा.प्र.से)**
**पीठासीन अधिकारी तथा**
मुख्य अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण,
आगरकरनगर, पुणे ४११००१

C:\Users\admin\Desktop\SABHAVRUTANTA\sabhavrutant A WARD.docx

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८
अ प्रभाग समिती सभापती निवडणूक२०१८

| अक्र. | उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नांवे |
|---|---|
| १ | निरंक |

दिनांक –२७/०४/२०१८

Ashok Kakade

अशोक काकडे (भा.प्र.से)
पीठासीन अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण,
आगरकरनगर, पुणे ४११००१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८

## मा. अ प्रभाग समितीची मासिक सभा

## कार्यपत्रिका क्रमांक ०१

## सभावृत्तांत

दिनांक २७/०४/२०१८ वेळ : स. १०.४५

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. अ प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दिनांक २७/०४/२०१८ रोजी सकाळी १०.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकर रामचंद्र पवळे सभागृहामध्ये नवनिर्वाचित अध्यक्षा तथा सभापती - मा श्रीम. गोरखे अनुराधा गणपत, अ प्रभाग समिती यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली . सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सभापती |
| 2. | मा.केशव हनुमंत घोळवे | सदस्य |
| 3. | मा. तुषार रघुनाथ हिंगे | सदस्य |
| 4. | मा. शैलजा अविनाश मोरे | सदस्या / उपमहापौर |
| 5. | मा. बाबर शर्मिला राजू | सदस्या |
| 6. | मा. [illegible] | सदस्या |

याशिवाय मा. [illegible] - क्षेत्रीय अधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय, श्री. रामकिसन लटपटे - प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा, अ प्रभाग समिती हे उपस्थित होते.

सर्वप्रथम नवनिर्वाचित मा. श्रीम. गोरखे अनुराधा गणपत - अध्यक्षा तथा सभापती, अ प्रभाग समिती यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारलेनंतर सभा सुरु करणेत आली.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक ०२ | विषय क्रमांक ०१ |
| दि. २३/४/२०१८ | विभाग : प्रशासन, अ प्रभाग |
| सुचक :- मा. तुषार रघुनाथ हिंगे | अनुमोदक :- मा. केशव हनुमंत घोळवे |

अ प्रभाग समितीची मासिक सभा प्रत्येक महिन्याचे दुस-या मंगळवारी सकाळी ११.३० वाजता आयोजित करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

त्यानंतर मा. श्रीम. गोरखे अनुराधा गणपत, अध्यक्षा तथा सभापती, अ प्रभाग समिती **यांनी** सभा संपल्याचे जाहीर केले.

[ गोरखे अनुराधा गणपत]

सभापती,

अ प्रभाग समिती

निगडी - 44

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी ४४

क्रमांक : अक्षेका/११/कावि/ ९०१ /२०१८

दिनांक : २७/४/२०१८

**प्रशासन अधिकारी**

**तथा सचिव सभा शाखा**

**अ प्रभाग समिती**

प्रत – सर्व संबंधित **शाखाप्रमुख व शाखा**धिकारी यांचेकडे

**पुढील योग्य त्या कार्यवाही**साठी रवाना.